# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी–चिंचवड | मंगळवार, दि. 5 नोव्हेंबर 2024 | पान- 1



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२


# पिंपरीमध्ये महायुतीची ताकद वाढली

## माघार घेतलेल्या 21 पैकी 19 उमेदवारांचा अण्णा बनसोडे यांना पाठिंबा : आमदार अण्णा बनसोडे यांनी सर्वांना विश्वासात घेऊन काम करणार असल्याची ग्वाही दिली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, आरपीआय (आठवले) या महायुतीची ताकद वाढली आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेतलेल्या २१ जणांपैकी १९ उमेदवारांनी महायुतीचे पिंपरी विधानसभेचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांना पाठिंबा दिला आहे. उमेदवारांनी पाठिंबा दिल्यानंतर आमदार अण्णा बनसोडे यांनी सर्वांना विश्वासात घेऊन काम करणार असल्याची ग्वाही दिली.

आकुर्डी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे, सदाशिव खाडे, अजिज शेख, संतोष बारणे, परशुराम वाडेकर, कविता आल्हाट, अंकुश कानडे, सिकंदर सूर्यवंशी, कुणाल वाव्हळकर, चंद्रकांता सोनकांबळे, काळूराम पवार, सुधीर कांबळे, जितेंद्र ननावरे, बाबासाहेब कांबळे आणि इतर पदाधिकारी, उमेदवार उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज माघार घेण्याची सोमवारी (दि.४) अंतिम मुदत होती. महायुतीच्या घटक पक्षातील बंडखोरी करून उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांची पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी तसेच शहरातील नेत्यांनी समजूत काढली. सर्वांनी महायुतीची ताकद वाढविण्यासाठी तसेच



राज्याच्या हितासाठी महायुतीचा मुख्यमंत्री होणे गरजेचे असल्याचे सांगत उमेदवारांना अर्ज माघारी घेण्यास सांगितले. महायुतीतील नेत्यांना उमेदवारांच्या मनधरणीसाठी मोठे यश मिळाले आहे. उमेदवारी अर्ज माघारी घेतलेल्या २१ जणांपैकी तब्बल १९ जणांनी पिंपरी विधानसभेचे महायुतीचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच उमेदवारांनी अण्णा बनसोडे यांचे काम सक्रियपणे करणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

शहराध्यक्ष योगेश बहल म्हणाले, ज्या उमेदवारांनी अर्ज दाखल केला होता त्यांना विश्वासात घेऊन महायुतीमध्ये एकत्रितपणे काम करण्यासाठी विनंती करण्यात आली आहे. त्यामध्ये आम्हाला यश आले आहे. रामदास आठवले, अजित पवार यांनी चंद्रकांता सोनकांबळे यांच्याशी चर्चा केली. चंद्रकांता सोनकांबळे यांना भविष्यात चांगले पद मिळण्यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्न करणार आहोत."

आमदार अण्णा बनसोडे म्हणाले, निवडणूक लढविण्याचा लोकशाहीत सर्वांना अधिकार आहे. पण पक्ष, संघटना यामध्ये काम करत असताना आपण एक कुटुंब आहोत. त्यातून कोणाला तरी एकाला जबाबदारी मिळते. महायुतीमध्ये पिंपरी विधानसभेची जबाबदारी मला मिळाली आहे. दरम्यान महायुतीमधील ज्येष्ठ नेत्यांनी नाराज उमेदवारांची नाराजी दूर केली आहे. त्यामुळे आता सर्वांना विश्वासात घेऊन काम करणार आहे."

आरपीआयचे राज्याचे संघटन सचिव परशुराम वाडेकर म्हणाले, "राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी आरपीआयने १२ जागा मागितल्या होत्या. पण आम्हाला एकही जागा मिळाली नाही. आरपीआय पक्ष १५ वर्षांपासून महायुतीमध्ये आहे. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार आम्ही युती धर्माचे पालन करत विधानसभा निवडणुकीत खांद्याला खांदा लावून काम करणार आहोत. चंद्रकांता सोनकांबळे यांची लढणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून ओळख आहे. त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी आपला राजीनामा पक्षाकडे दिला होता. मात्र त्यांचा राजीनामा पक्षाने स्वीकारला नाही. त्यामुळे चंद्रकांता सोनकांबळे या आरपीआय पक्षाच्या माध्यमातून यापुढील काळात सक्रियपणे काम करणार आहेत."

चंद्रकांता सोनकांबळे म्हणाल्या, "आम्ही दरवेळी तिकिटाची मागणी करतो पण आम्हाला तिकिट मिळत नाही. या वेळी राज्यस्तरावर चांगले काम करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पद देण्याचे आश्वासन युतीमधील नेत्यांनी दिले आहे. त्यामुळे या निवडणुकीत आम्ही आमदार अण्णा बनसोडे यांचे काम करणार आहोत."

बाबा कांबळे म्हणाले, "आमच्या मागण्या संदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा झाली. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही चर्चा झाली. त्यांनी महायुतीचे सरकार आल्यानंतर आमच्या मागण्यांबाबत योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन मिळाल्याने उमेदवारी अर्ज माघारी घेतला आहे. आम्ही या निवडणुकीत आमदार अण्णा बनसोडे यांचे काम करणार आहोत."

"महायुतीचा मुख्यमंत्री होण्यासाठी माघार घेतली आहे. निवडणुकी संदर्भात जे मतभेद होते ते दूर झाले आहेत. पुढील काळात एकत्रित काम करणार असल्याचे उमेदवार जितेंद्र ननावरे यांनी सांगितले.

"व्यक्तीपेक्षा पक्ष मोठा असतो पक्षासाठी काम करण्याच्या सूचना वरिष्ठांनी दिल्या आहेत. आम्ही एकत्रितपणे आमदार अण्णा बनसोडे यांचे काम करणार असून त्यांना ५० हजारांचे मताधिक्य मिळेल, असा विश्वास उमेदवार काळुराम पवार यांनी व्यक्त केला.

### अण्णा बनसोडे यांना पाठिंबा दिलेले उमेदवार

» चंद्रकांता सोनकांबळे, बाबासाहेब कांबळे, जितेंद्र ननावरे, काळुराम पवार, रीता सोनावणे, सुरेश लोंढे, प्रल्हाद कांबळे, चंद्रकांत लोंढे, स्वप्निल कांबळे, नवनाथ शिंदे, कृष्णा कुडुक, गौतम कूडुक, दादाराव कांबळे, मयूर जाधव, सुधीर कांबळे, मुकुंद ओव्हाळ, जाफर चौधरी, हेमंत मोरे.

# भोसरी विधानसभेत महेश लांडगे आणि अजित गव्हाणे यांच्यासह 11 उमेदवारांच्यात होणार लढत

## भोसरी विधानसभा मतदार संघामधे एकुण 18 उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली होती

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदार संघामधे एकुण १८ उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली होती. वैधरित्या नामनिर्देशीत एकुण १८ उमेदवारापैकी ७ उमेदवारांनी त्यांची उमेदवारी माघार घेतली आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार महेश लांडगे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांच्यात प्रमुख लढत होणार असून भोसरी विधानसभा मतदार संघामधे एकूण ११ उमेदवार रिंगणात आहेत.



**निवडणूक लढविणारे उमेदवार**

०१.महेश किसन लांडगे, भारतीय जनता पार्टी

०२.अजित दामोदर गव्हाणे – नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी -शरदचंद्र पवार

०३.बलराज उध्दवराव कटके, बहुजन समाज पार्टी

०४.अमजद महेबूब खान, ऑल इंडिया मजलिस- ए- इन्कलाब – ए – मिल्लत

०५.जावेद रशीद शहा, स्वराज्य शक्ती सेना

०६.अरुण मारुती पवार – अपक्ष

०७.खुदबुद्दीन होबळे (तन्वीरशेठ) – अपक्ष

०८.गोविंद हरीभाऊ चुनचुने – अपक्ष

०९.डोळस हरिश बाजीराव – अपक्ष

१०.रफीक रशीद कुरेशी – अपक्ष

११.शलाका सुधाकर कोंडावार – अपक्ष

**माघार घेतलेल्या उमेदवारांची नावे**

०१.परमेश्वर गोविंदराव बुर्ले

०२.रामा मोहन ठोके

०३.गायकवाड सुरज चंद्रकांत

०४.दत्तात्रय कोंडीबा जगताप

०५.बापूसाहेब ऊर्फ सुभाष मारुती वाघमारे

०६.रवि बाबासाहेब लांडगे

०७.संतोष काळुराम लांडगे

# चिंचवड विधानसभेच्या विकासासाठी शंकर जगताप यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणणार : नाना काटे

## बंड शमविण्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांनाही यश आले

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे बंडखोर उमेदवार नाना काटे यांचे बंड शमविण्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांनाही यश आले आहे. त्यामुळे नाना काटे यांनी आपला उमेदवारी अर्ज माघारी घेत महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे महायुतीतील बंडखोर उमेदवार नाना काटे हे आपला उमेदवारी अर्ज माघारी घेणार का, याबाबत अनेक तर्क- वितर्क लावण्यात येत होते. दुपारी महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनी नाना काटे यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर दोघांनी एकत्र येऊन नाना काटे यांच्या उमेदवारी माघारीचा निर्णय जाहीर केला.



यावेळी बोलताना नाना काटे म्हणाले की, दोन दिवसांपूर्वी आमचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा झाली होती. तसेच आज सकाळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचाही फोन आला होता. दोघांच्याही विनंतीला मान देऊन आणि आमच्या कार्यकर्त्यांशी चर्चा करून मी आज उमेदवारी अर्ज माघारीचा निर्णय घेतला आहे. यापुढे आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व माजी नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते महायुतीचा धर्म पाळणार असून शंकर जगताप यांच्या विजयासाठी जोमाने काम करणार आहोत.

यावेळी बोलताना महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनी नाना काटे यांच्या माघारीच्या निर्णयाचे स्वागत केले. राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा यावे, यासाठी नाना काटे व राष्ट्रवादी काँग्रेस मधील त्यांच्या सहकाऱ्यांनी सामंजस्याची भूमिका घेतल्याबद्दल महायुतीचा उमेदवार या नात्याने मी त्यांना धन्यवाद देतो, असे जगताप म्हणाले.

त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी नगरसेवक प्रशांत शितोळे, मयूर कलाटे, विनोद नढे, संतोष कोकणे, विजू अण्णा जगताप, राजेंद्र साळुंखे, मनोज खानोलकर, नवनाथ नढे, श्याम जगताप, तानाजी जवळकर, शिरीष साठे, नीलेश डोके, हरिभाऊ तिकोने, यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# मावळातील अपक्ष उमेदवार महाविकासआघाडीचा की महायुतीचा नेमका कोणत्या पक्षांचा अधिकृत पाठिंबा ?

## मावळ विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवाराला सर्वपक्षीय पाठिंबा असल्याचा कांगावा

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ विधानसभेसाठी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवाराला सर्वपक्षीय पाठिंबा असल्याचा कांगावा केला जात असला तरी या उमेदवाराला नेमका कोणत्या पक्षाने अधिकृत पाठिंबा दिला आहे हे मात्र अनुत्तरीतच आहे. महायुती मधील घटक पक्ष असलेल्या भाजपातील काही नेत्यांनी आमदार सुनील शेळके यांच्याशी फारकत घेत आपल्या पदांचे राजीनामे देत अपक्ष उमेदवार बापूसाहेब भेगडे यांना पाठिंबा दिला असला तरी तो पक्षाचा अधिकृत पाठिंबा नाही. काही विशिष्ट हेतूने एकत्रित आलेल्या व्यक्तींनी तो पाठिंबा दिला आहे.




महाविकास आघाडी मधील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने तालुका अध्यक्ष यांनी अपक्ष उमेदवाराला पाठिंबा दिला असला तरी पक्षाकडून याबाबतचे कोणतेही पाठिंबाचे पत्रक देण्यात आलेले नाही. तीच परिस्थिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आहे. तालुकाध्यक्ष यांनी पाठिंबा दर्शविला असला तरी पक्षाकडून कोणतेही पाठिंबाचे अधिकृत पत्र अपक्ष उमेदवाराला देण्यात आलेले नाही. मावळ तालुक्यातील काँग्रेस पक्षाने आतापर्यंत आपली भूमिका जाहीर केलेली नाही. जोपर्यंत पक्ष आदेश येणार नाही तोपर्यंत आम्ही कोणालाही पाठिंबा देणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले आहे. ज्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षामधून बाहेर पडत बापूसाहेब भेगडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, त्या पक्षाकडून देखील त्यांना पाठिंबा देण्यात आलेला नाही. असे असताना तालुक्यातील काही चाणक्य नेते कशाच्या आधारावर अपक्ष उमेदवार सर्वपक्षीय उमेदवार असल्याचे उघडपणे सांगत आहेत, याची सध्या मावळ तालुक्यामध्ये चर्चा रंगत आहे. काँग्रेस पक्षाच्या एका ज्येष्ठ नेत्यावर पक्षाचा आदेश डावलून महायुतीच्या उमेदवाराच्या व्यासपीठावर गेल्यामुळे सहा वर्षे निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तर अपक्ष उमेदवाराच्या समर्थनार्थ पत्रकार परिषद घेतल्याप्रकरणी काँग्रेसच्या दोन ज्येष्ठ नेत्यांना शोकास नोटीस पक्षाकडून बजावण्यात आली आहे. कोणत्याही राजकीय पक्षाने मावळ तालुक्यामधील कोणत्याही उमेदवाराला अधिकृतरित्या पाठिंब्याचे पत्र दिलेले नाही. केवळ तालुकास्तरावर आपले हितसंबंध जोपासण्यासाठी तालुका अध्यक्षांनी आपल्या सोयीनुसार पाठिंबे जाहीर केले आहेत. आतापर्यंत कोणीही त्यासंबंधीचे अधिकृत पत्र प्रसिद्ध केलेले नाही.

महायुतीकडून मावळ तालुक्यामध्ये आमदार सुनील शेळके यांना अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली असून महायुतीमधील घटक पक्ष असलेले राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष भारतीय जनता पार्टी शिवसेना शिंदे पक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष हे आज तरी सुनील शेळके यांच्या सोबत आहेत. महा विकास आघाडी कडून मावळ विधानसभेची जागा नेमक्या कोणत्या पक्षाला सुटली हे देखील अद्याप या महाविकास आघाडी मधील घटक पक्षांना ठोसपणे सांगता येत नाही. उमेदवारी अर्ज भरण्याची मदत संपून गेली असल्यामुळे महाविकास आघाडीला मावळ तालुक्यामधून एकही उमेदवार मिळालेला नाही ही त्यांच्यासाठी शोकांतिका आहे. अपक्ष उमेदवार हे जोपर्यंत स्वतः पुढे येऊन आपण कोणत्या पक्षाला निवडून आल्यानंतर पाठिंबा देणार ही अधिकृतपणे सांगत नाही तोपर्यंत मावळ तालुक्यातील राजकीय पक्षांमधील हा गोंधळ असाच कायम राहणार आहे. मावळ तालुक्यातील राजकीय पक्षांच्या या गोंधळाच्या स्थितीमुळे सर्वसामान्य कार्यकर्ता मात्र संभ्रमात आहे. पक्षाचा आदेश पाळायचा की तालुका अध्यक्षांचा हेच समजत नसल्याने अद्यापही कार्यकर्ते वेट अँड वरच्या भूमिकेमध्ये आहेत. अनेकांनी मात्र जो पक्षाचा अधिकृत आदेश असेल त्याच आदेशाची आम्ही पालन करणार असे सांगत तालुका अध्यक्षांच्या पाठिंबांवर हरकती घेतल्या आहेत. अपक्ष उमेदवार हा सर्व पक्षीय उमेदवार आहे असे भासवत काही चाणक्य मंडळी मावळ तालुक्यातील सर्व सामान्य मतदानामध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम करत आहेत. त्यामुळे पुढील पंधरा दिवसात मावळ तालुक्यातील राजकारणामध्ये कोणते कोणते ट्विस्ट येणार हे पाहणे मोठे औत्सुक्याचे ठरणार आहे.

---

# पिंपरी विधानसभा मतदारसंघात अण्णा बनसोडे, सुलक्षणा धर यांच्यासह 15 उमेदवार रिंगणात

## तब्बल 21 उमेदवारांनी अर्ज मागे घेत निवडणुकीतून माघार घेतली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार अण्णा बनसोडे आणि महाविकास आघाडीच्या उमेदवार सुलक्षणा धर यांच्यात थेट लढत होणार असून एकूण १५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटचा दिवस होता. दरम्यान तब्बल २१ उमेदवारांनी अर्ज मागे घेत निवडणुकीतून माघार घेतली आहे.



**पिंपरी विधानसभा मतदारसंघातील उमेदवार**

०१) अण्णा दादू बनसोडे (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी),
०२) सुलक्षणा राजू धर (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार),
०३) सुंदर म्हसुकांत कांबळे (बहुजन समाज पार्टी),
०४) बाळासाहेब नामदेव ओव्हाळ (महाराष्ट्र स्वराज्य पार्टी),
०५) मनोज भास्कर गरबडे (वंचित बहुजन आघाडी),
०६) राजेंद्र मानसिंह छाजछिडक (राष्ट्रीय वाल्मीकी सेना पक्ष),
०७) राहुल मल्हारी सोनवणे, (विदुथलाई चिरुथाईगलगाकाची)
०८) कैलास नारायण खुडे (अपक्ष)
०९) नरसिंग ईश्वरराव कटके (अपक्ष),
१०) भिकाराम किसन कांबळे (अपक्ष),
११) मीनाताई यादव खिलारे (अपक्ष),
१२) राजू सुदाम भालेराव (अपक्ष),
१३) सचिन महिपती सोनवणे (अपक्ष),
१४) सुधीर लक्ष्मण जगताप (अपक्ष),
१५) सुरेश हरिभाऊ भिसे (अपक्ष)

**यांनी घेतले उमेदवारी अर्ज मागे**

१. गौतम सुखदेव चाबुस्कवार-अपक्ष
२. बाबासाहेब किसन कांबळे- अपक्ष
३. रिता प्रकाश सोनावणे – अपक्ष
४. दिपक सौदागर रोकडे- अपक्ष
५. चंद्रकांता लक्ष्मण सोनकांबळे – अपक्ष
६. सुरेश मधूकर लोंढे – अपक्ष
७. प्रल्हाद रामभाऊ कांबळे- अपक्ष
८. अॅड. गौतम प्रल्हाद कुडुक- अपक्ष
९. कृष्णा प्रल्हाद कुडुक- अपक्ष
१०. चंद्रकांत महादेव लोंढे – अपक्ष
११. स्वप्रिल दादाराव कांबळे – अपक्ष
१२. नवनाथ चंद्रकांत शिंदे – अपक्ष
१३. मनोज विष्णू कांबळे – अपक्ष
१४. काळूराम मारुती पवार – अपक्ष
१५. जितेंद्र बाबासाहेब ननावरे – अपक्ष
१६. मयूर भरत जाधव – अपक्ष
१७. दादाराव किसन कांबळे – अपक्ष
१८. मुकुंद आनंदा ओव्हाळ – अपक्ष
१९. जफर खुर्शीद चौधरी – अपक्ष
२०. सुधीर हिंदुराव कांबळे- अपक्ष
२१. हेमंत अर्जुन मोरे – अपक्ष

---

# चिंचवड विधानसभेत 21 उमेदवार रिंगणात

## शंकर जगताप, राहुल कलाटे आणि भाऊसाहेब भोईर यांच्यात प्रमुख लढत

**पुणे | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार शंकर जगताप, महाविकास आघाडीचे राहुल कलाटे आणि अपक्ष उमेदवार भाऊसाहेब भोईर यांच्यात प्रमुख लढत होणार आहे. या प्रमुख उमेदवारांसह तब्बल २१ उमेदवार चिंचवड विधानसभेच्या रिंगणात आहेत. दरम्यान ७ जणांनी आज शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज मागे घेत निवडणुकीतून माघार घेतली आहे.



**चिंचवड विधानसभा निवडणुकीतील उमेदवार**

०१) जगताप शंकर पांडुरंग- भारतीय जनता पार्टी
०२) कलाटे राहुल तानाजी – नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार
०३) भाऊसाहेब सोपानराव भोईर- अपक्ष
०४) राजेंद्र कुंडलिक गायकवाड- बहुजन समाज पार्टी
०५) भापकर मारुती साहेबराव- महाराष्ट्र स्वराज्य पक्ष
०६) रफीक रशीद कुरेशी- स्वराज्य शक्ती सेना
०७) सतिश भास्कर काळे- स्वराज्य राष्ट्र निर्माण सेना
०८) सिध्दिक इस्माईल शेख- ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक
०९) अतुल गणेश समर्थ- अपक्ष
१०) अॅड. अनिल बाबू सोनवणे – अपक्ष
११) करण नानासाहेब गाडे- अपक्ष
१२) जावेद रशीद शेख- अपक्ष
१३) धर्मराज अनिल बनसोडे- अपक्ष
१४) मयुर बाबु घोडके- अपक्ष
१५) रविंद्र विनायक पारधे- अपक्ष
१६) राजेंद्र आत्माराम पवार- अपक्ष
१७) राजेंद्र मारुती काटे- अपक्ष
१८) रुपेश रमेश शिंदे- अपक्ष
१९) विनायक सोपान ओव्हाळ- अपक्ष
२०) सचिन अरुण सिद्धे- अपक्ष
२१) सचिन वसंत सोनकांबळे- अपक्ष

**यांनी घेतली निवडणुकीतून माघार**

०१) विठ्ठल कृष्णाजी काटे
०२) संदीप गुलाबराव चिंचवडे
०३) अरुण श्रीपती पवार
०४) शिवाजी तुकाराम पाडुळे
०५) सीमा देवेंद्रसिंग यादव
०६) जितेंद्र प्रकाश मोटे
०७) भरत नारायण महानवर

# आरटीओची एसएमएस सेवा फेल?

## दंडाची रक्कम पोहोचली साडे दहा कोटी रुपयांपर्यंत : वसूल करण्यासाठी पाठविले एक लाख मेसेज

**पिंपरी | प्रतिनिधी**

थकित दंड वसूल करण्याबाबत पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) एसएमएस सुविधा सुरू केली होती. मात्र त्यानंतरदेखील दंडाची रक्कम भरली जात नसल्याने ही सेवा सपशेल फेल गेली असल्याचे दिसून येते. विविध दंडाची १० कोटी ३९ लाख ७६,०५१ एवढी रक्कम थकीत आहे. एकूण साडे पाच लाखांहून अधिक चलने आहेत. ही रक्कम वाढत जात असल्याने आरटीओने पाठवलेले एसएमएसची संबंधित वाहनचालकांनी दखल घेतली नसल्याचे दिसून आले.




वाहनधारकास सीपी-आरटीओपीसीएम या नावाने लघुसंदेश सुविधा सुरू करण्यात आली आहे. संबंधित खासगी कंपनीशी आरटीओ विभागाने करार देखील केला आहे. त्यामुळे आरटीओकडून वाहनधारकांचा नंबर संबंधित कंपनीकडे गेल्यानंतर त्वरित मेसेज प्राप्त होत आहेत. मात्र त्याची दखल वाहनचालक घेत नसल्याचे दिसून येत आहे. या सेवेचा आढावा आरटीओ विभागाचे वरिष्ठ अधिकारी घेणार होते. मात्र, त्याचा प्रतिसाद मिळत नसल्याने या सेवेचा उपयोग नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

आरटीओकडे थकीत दंड न भरणाऱ्या वाहनचालकांची यादी वाढतच चालली आहे. वाहनचालकांना नोटीस पाठवूनदेखील कोणताही प्रतिसाद मिळत नाही.

खासगी कंपनीच्या मार्फत ही सेवा सुरू केली आहे. या संदेशामध्ये दिलेल्या लिंकवर क्लिक केल्यानंतर कार्यालयाचे इंग्रजी व मराठी स्वरूपातील मागणीपत्र नागरिकांना पाहता येणार आहे, असे पिंपरी चिंचवडचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यांनी सांगितले. आत्तापर्यंत जवळपास एक लाखाहून अधिक क्रमांकांची यादी या कंपनीकडे देण्यात आली आहे. मात्र त्यापैकी किती जणांनी पैसे भरले याची नेमकी माहिती आरटीओ अधिकाऱ्यांना नाही.

रस्त्यावर धावणाऱ्या अवजड वाहनांबरोबरच, प्रवासी वाहतूक आणि स्कूल बस व्हॅन यांना फिटनेस सर्टिफिकेट अनिवार्य आहे. मात्र, ते याकडे दुर्लक्ष करतात. कायदेशीररित्या त्यांना नोटीस देण्यात येते. तरीसुद्धा अनेक वाहनचालक त्याकडे गांभीर्याने पाहात नाहीत. त्यामुळे आता या वाहनधारकांची यादी तयार करण्याचे काम सुरू आहे. दुसऱ्या टप्प्यात या वाहनांनादेखील एसएमएस केले जाणार आहेत. मात्र याआधी मेसेज पाठवलेल्या अनेक वाहनचालकांनी त्याची गंभीर दखल घेतली नसते दिसून येत आहे.

दरम्यान, मुंबई-पुणे महामार्गावर वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्यांना दंड ठोठावले जातात. ते दंडही पिंपरी चिंचवड आरटीओत येतात. त्यामुळे दंडाची रक्कम जास्त वाढली आहे. वाहतूक नियम उल्लंघनाबाबत इ चलनाच्या नोटीस पहिल्या टप्प्यात पाठवल्या आहेत. मात्र, या सेवेचा कितपत फायदा झाला याची नेमकी माहिती आरटीओ अधिकाऱ्यांकडे नाही. अनेकांनी संबंधित एसएमएस अद्याप वाचलाच नसल्याचे दिसून येत आहे.

### रिक्त पदे भरल्याचा अधिकाऱ्यांचा दावा

» पिंपरी चिंचवड आरटीओ याचा दर्जा वाढल्याने आता ते प्रादेशिक परिवहन कार्यालयास झाले आहे. मात्र त्या तुलनेने अधिकारी कर्मचारी नसल्याने कामे वेगाने होत नसल्याचे आरोप होत आहे. मात्र संबंधित रिक्त पदांची नेमणूक केली आहे, अशी माहिती प्रादेशिक अधिकारी संदेश चव्हाण यांनी दिली. तसेच रिक्त पदामुळे कोणतेही काम रखडली नसल्याची त्यांनी देखील स्पष्ट केले.

# 'लाडक्या बहिणी'नी दिला शंकर जगताप यांना 'विजयाचा आशीर्वाद'

## भाऊबीज सणाला शंकरभाऊ जगताप यांचा संकल्प : लाडक्या बहिणींना आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या स्वावलंबी बनविणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

आजच्या युगात माझी ताई एक कर्तृत्ववान स्त्री झालेली मला बघायचे आहे. शिक्षण ही त्या कर्तुत्वाची पहिली पायरी आहे. तुला आवडत्या विषयात भरपूर शिक्षण घेता यावे. चांगली नोकरी किंवा व्यवसाय करता यावा. त्यांची तजवीज करणे, ही भाऊ म्हणून माझी जबाबदारी आहे, असा संकल्प भाजप – शिवसेना – राष्ट्रवादी काँग्रेस – आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनी रविवारी (दि.3) केला आहे.

भाऊबीज सणाच्या दिवशी चिंचवड विधानसभा मतदार संघातील असंख्य महिला भगिनींनी त्यांचे औक्षण केले. त्यावेळी त्यांनी आपल्या लाखो महिला भगिनींचे आभार मानत वरील संकल्प करायचे ठरविले आहे. शंकर जगताप यांनी चिंचवड विधानसभा मतदार संघातील माजी नगरसेविका व नागरिकांच्या गाठी भेटी घेतल्या.



शंकर जगताप म्हणाले की, बहिणीच्या शिक्षणाचा मार्गात आर्थिक, सामाजिक अडथळे येऊ नयेत. तुझे शिक्षण निर्विघ्नपणे पार पडावे. तू उच्चविद्याविभूषित व्हावीस, यासाठी मी प्रयत्न करेन.

तुझ्या 'सक्षमते'ची दुसरी पायरी म्हणजे आर्थिक स्वावलंबन. नोकरी असो, व्यवसाय असो वा स्वयंरोजगार यापैकी तुझ्या आवडीचा पर्याय निवडायचे स्वातंत्र्य तुला असायला हवे. कामाच्या ठिकाणी, प्रवासात सुरक्षित वाटायला हवे. आर्थिक मोबदल्याच्या बाबतीत स्त्री-पुरुष भेदभाव तुझ्या वाट्याला येता कामा नये. अगदी उतरवायतही तुला स्वावलंबी, स्वाभिमानी जीवन जगता यायला हवे. हा माझा संकल्प आहे.

या सर्व गोष्टींसाठी मनापासून प्रयत्न करण्याचे निर्धार, हीच माझी तुला ओवाळणी. तिचा स्वीकार कर आणि मगच माझ्या यशासाठी मनःपूर्वक प्रार्थना कर, एवढीच विनंती, अशी भावनिक साद शंकर जगताप यांनी आपल्या लाखो बहिणींना घातली आहे.

# ‘पीएमसी केअर’ला आयईईई इंटरनॅशनल स्मार्ट सिटीज पुरस्कार

## महायुतीकडून चंद्रकांत पाटील, माविआकडून चंद्रकांत मोकाटे आणि मनसेकडून किशोर नाना शिंदे निवडणुकीच्या रिंगणात

**पुणे | प्रतिनिधी**

आयईईई स्मार्ट सिटीज टेक्निकल कम्युनिटीच्या वतीने आंतरराष्ट्रीय स्तरावर देण्यात येणारा ‘इमर्जिंग इकॉनॉमी - लेगसी सिटीज’ श्रेणीतील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार पुणे महानगरपालिकेच्या पीएमसी केअर प्रोजेक्टला मिळाला आहे. आयईईई संस्थेच्या वतीने थायलंडमधील पटाया येथे २९ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२४ याकाळात झालेल्या आयईईई इंटरनॅशनल स्मार्ट सिटीज कॉन्फरन्समध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. पुणे महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. राजेन्द्र भोसले यांना या सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते.



पुणे महानगरपालिकेच्या विविध उपक्रमांमध्ये नागरिकांचा सक्रीय सहभाग असावा, तसेच महानगरपालिकेकडून पुरवण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधा मोबाईल ॲप्लिकेशन आणि पोर्टलच्या माध्यमातून नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी सिटीझन एंगेजमेंट प्लॅटफॉर्म पीएमसी केअर नव्या स्वरुपात विकसित करण्यात आला आहे. पीएमसी केअर प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून नागरिकांसाठी उपयुक्त ठरणारी विविध माहिती देण्यात येत असते. यामध्ये प्रामुख्याने तक्रार निवारण, मालमत्ता करासह मनपाचे सर्व कर ऑनलाईन भरण्याची सुविधा, पाणी बंद सूचनेसह पुणे महापालिकेचे अपडेट्स, मनपाच्या नागरिकाभिमुख सेवांची माहिती, पुणे शहरातील घडामोडींविषयी अपडेट्स आसपासच्या सेवा-सुविधा आदींचा समावेश आहे. पुणे शहरातील लाखो नागरिक या सेवेचा लाभ घेत आहेत. त्यातच आता जागतिक स्तरावर देखील पीएमसी केअर प्लॅटफॉर्मची दखल घेण्यात आलीय.

महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक डॉ. राजेन्द्र भोसले, मा. अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी, मा. उप आयुक्त संजय शिंदे, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सिस्टीम मॅनेजर मा.राहुल जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पीएमसी केअर टीमचे काम सुरू असून जागतिक स्तरावर पीएमसी केअरचा गौरव झाल्यामुळे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पुणे महानगरपालिका प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.

### पीएमसी केअरवर नागरिकांना लाभ घेता येणाऱ्या प्रमुख सेवा:

- तक्रार निवारण
- मालमत्ता करासह मनपाचे सर्व कर ऑनलाईन भरण्याची सुविधा
- पाणी बंद सूचनेसह पुणे महापालिकेचे अपडेट्स
- मनपाच्या नागरिकाभिमुख सेवांची माहिती
- पुणे शहरातील घडामोडींविषयी अपडेट्स
- तुमच्या आसपासच्या सेवा-सुविधा

### जागतिक स्तरावरील संघटना

आईईई ही जागतिक स्तरावरील संघटना आहे. वेगवेगळ्या स्मार्ट सिटीमध्ये तेथील नागरिकांसाठी राबवण्यात येणाऱ्या टेक्निकल गोष्टींची इतर स्मार्ट सिटीसाठी कसा उपयोग होऊ शकतो, यावर सातत्याने प्रकाश या संघटनेच्या माध्यमातून टाकण्यात येत असतो. याशिवाय स्मार्ट सिटींना प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक स्तरावर संस्थेच्या वतीने पुरस्कारही देण्यात येत असतात. नागरिकांना पीएमसी केअरवर पुणे महानगरपालिकेच्या सोयीसुविधांचा लाभ सहज घेता असल्याने आईईच्या वतीने ‘इमर्जिंग इकॉनॉमी - लेगसी सिटीज’ या श्रेणीतील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन पुणे महानगरपालिकेचा गौरव करण्यात आला. या पुरस्कारासाठी जगभरातून प्रवेशिका आल्या होत्या. यासर्वांमध्ये पीएमसी केअर प्लॅटफॉर्मने बाजी मारली आहे.

# प्रदूषणयुक्त श्वास अन् कानठळ्या बसवणारा आवाज!

## हरातील हवेची गुणवत्ता दोनशे-तीनशे पार गेल्याचे निदर्शनास : श्वसनाच्या त्रासाने पुणेकर बेजार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील अनेक भागात यंदाची दिवाळी फटाके वाजवून दणक्यात साजरी करण्यात आली. या फटाक्यांच्या आवाजांनी कानठळ्या बसल्या आणि हवेची गुणवत्ता ढासळल्याने प्रदूषणयुक्त श्वास पुणेकरांना घ्यावा लागला. शहरातील हवेची गुणवत्ता दोनशे-तीनशे पार गेल्याचे निदर्शनास आले. त्यातून अनेकांना श्वसनाचा त्रास सहन करावा लागला.



दरवर्षीच दिवाळीत फटाक्यांची आतषबाजी होते; परंतु, गेल्या काही वर्षांमध्ये फटाक्यांमुळे शहरातील हवेची गुणवत्ता चांगलीच ढासळत आहे. त्याने अनेकांना त्रास सहन करावा लागतो. ज्यांना श्वसनाचा त्रास आहे. दमा, अस्थमा आहे त्यांच्यासाठी ही हवा धोकादायक ठरते. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा उपक्रम अनेकजण राबवतात. परंतु त्यातील सहभाग अजूनही कमीच आहे. पुणे शहरामध्ये ठिकठिकाणी यंदा फटाक्यांचे स्टॉल्स लागले होते. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. अनेक फटाक्यांचा आवाज मर्यादेपेक्षा अधिक होता. त्यामुळे घरात बसलेल्यांनाही त्या आवाजाने कानठळ्या बसत होत्या.

काय परिणाम होतो?

शहरामध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक राहतात. तसेच लहान मुले असतात. त्यांना या फटाक्यांचा प्रचंड त्रास झाला. ज्यांना श्वसनाचा आजार आहे, त्यांना तर ही प्रदूषणयुक्त हवा धोकादायक ठरते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे शहरात हवेची गुणवत्ता नोंदवली गेली. दरवर्षीच प्रदूषणाची नोंद केली जाते, मात्र त्यावर उपाययोजना काहीही होत नाहीत. फटाक्यांमधील घातक घटकांमुळे श्वसनाचा आजार होण्याचा धोका असतो.

### पुणे शहरातील हवा ?

| ठिकाण | १ नोव्हेंबर | २ नोव्हें | ३ नोव्हें | ४ नोव्हें |
|---|---|---|---|---|
| हडपसर | ९५ | २५१ | २८१ | ७६ |
| कात्रज | १७७ | १९० | १८० | ८७ |
| भूमकर नगर | १५८ | १९० | १७४ | ७६ |
| विद्यापीठ | १३६ | २६३ | २९८ | ७८ |
| शिवाजीनगर | ११२ | २२९ | २५४ | ९१ |
| कर्वेरोड | १२० | १९४ | २०९ | ७० |
| लोहगाव | ९९ | १३१ | १५४ | ९१ |
| पाषाण | ८१ | १७५ | १५८ | ७६ |

### हवेची गुणवत्ता कशी?

- ० ते ५० : चांगली
- ५० ते १०० : समाधानकारक
- १०० ते २०० : चिंताजनक
- २०० ते ३०० : खूपच खराब
- ३०० ते ४०० : धोकादायक